कायम विना अनुदानित तत्वावरील प्राथमिक शाळांचे परवानगी आदेश.

महाराष्ट्र शासन

क्रमांक: नप्राशा १००५/(७६/२००५)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ जुलै, २००५.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
[illegible] पुणे

विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त इतर माध्यमाच्या (मराठी) खाजगी प्राथमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत

नविन प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ०४ ( चार ) शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त (मराठी ) सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास "जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक . वीएलएस १०००/(५५७/२०००)/(१) प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडुन रु २०/- एवढ्या रकमेच्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असे हमी पत्र संस्थेकडून प्रथम लिहून [illegible] आपल्या कार्यालयातील संबंधीत नस्तीवर कायम स्वरुपी जतन करुन ठेवावे व त्याच्या प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची प्रत शासनासही माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र.वीएलएस १०००/(५५७/२०००)(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

मुख्याध्यापक
ज्ञानवर्धिनी विद्यालय चाकण,
ता.खेड,जि.पुणे ४१०५०१

महाराष्ट्र शासन

क्रमांक : विएलएस १००४/(४२/०४)/प्राशि-३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०७ जुलै, २००४

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय:- सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षामध्ये खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळणेसाठी उशीरा चलन व प्रस्ताव सादर करण्यास परवानगी मिळणेबाबत.

खालील नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थांना त्या संस्थाच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी तसेच त्या संस्थांच्या नांवासमोर दर्शविण्यांत आलेल्या माध्यमासाठी सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदान तत्वावर नवीन प्राथमिक शाळेचा प्रस्ताव विलंब शुल्कासह (रु.५००/- + रु.५००/-) दाखल करण्यास विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने आपण पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १ | आसिना ग्रामीण विकास संस्था, गिट्टी खदान, नागपूर | नागपूर | उर्दू |
| २ | स्व. राजारामजी दुबे बहुउद्देशीय शिक्षण संस्था, राजगृहनगर, हिंगणा रोड, नागपूर | नागपूर. | इंग्रजी |
| ३ | योगिराज बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ (जाधववाडी), चिखली, ता. हवेली, जि.पुणे | पुणे | |
| ४ | शिवाजी बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, ता. बार्शी, जि. सोलापूर | बेलगांव, ता.बार्शी | |

TRUE COPY

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | वसंतराव नाईक शिक्षण संस्था, रामनगर तांडा, मांडखेल, जि.बीड | परळी वैजनाथ व नागापूर कॅम्प,ता.परळी वैजनाथ | मराठी |
| ६ | ग्रामीण समाज मंडळ, इंदारानगर तांडा, सोनखेड,जि.परभणी | सोनपेठ जि. परभणी | इंग्रजी |
| ७ | सईद अहमद खान प्रतिष्ठान, औरंगाबाद | संजयनगर, बायजीपुरा,औरंगाबाद | |
| ८ | बादशाही अन्जुमने इशारत तालीम, औरंगाबाद | मिसरवाडी, औरंगाबाद | |
| ९ | आदर्श शिक्षण संस्था, वार्ड कारंजा (लाड),जि.वाशीम | कारंजा (लाड) | मराठी व इंग्रजी |
| १० | नवजीवन सार्वजनिक व शैक्षणिक विकास मंडळ, इंदापूर,जि.पुणे | पांगरे, ता.करमाळा,जि.सोलापूर | इंग्रजी |
| ११ | इस्लामीक अॅण्ड मॉडर्न एज्युकेशन सोसायटी | बिरादर बाग, मालेगाव,जि.नासिक | उर्दू |
| १२ | उन्नती एज्युकेशन सोसायटी, नाशिक | सातपूर(गोपाळनगर) | |
| १३ | मोहम्मदीया मायनॉरिटी एज्युकेशन सोसायटी, अंजनगांव सुर्जी जि.अमरावती | नगमी प्लॉट, अंजनगा, ता. अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती | उर्दू |
| १४ | जैन युवा संघ, कोल्हापूर | | |
| १५ | अलशिफा मेडिकल एज्युकेशन सोसायटी, धुळे | | उर्दू |
| १६ | जगतगुरु श्री वार्ये एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर | कोल्हापूर | इंग्रजी |
| १७ | स्व. गुलाबराव मोरे प्रतिष्ठान, चाकण | चाकण, जि. पुणे | मराठी व इंग्रजी |
| १८ | विवेक शिक्षण संस्था, धनकवडी,जि.पुणे | | |

(सु.ह. उमराणीकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अग्रेषित.

त्यांना कळविण्यात येते की, उक्त संस्थेचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर राज्यस्तरीय समितीच्या योग्य त्या शिफारशीसह एकत्रितपणे सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावासोबत शासनाकडे तात्काळ सादर करावेत.

TRUE COPY

शासन पत्र क्रमांक नप्राशा-१००५/(७६/०५)/प्राशि-३, दिनांक : १६ जुलै, २००५ चे सहपत्र.

## सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित मराठी माध्यमाच्या परवानगी दिलेल्या प्राथमिक शाळांची नांवे.

### जिल्हा - सांगली

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | भारतीय शिक्षण संस्था, इस्लामपूर. | आष्टा, जि. सांगली | मराठी | १ ली |
| | | **जिल्हा - पुणे** | | |
| २ | स्वर्गीय गुलाबराव गोरे प्रतिष्ठान, चाकण, ता.खेड | चाकण, ता.खेड | मराठी | १ ली |
| ३ | मराठवाडा एज्युकेशन सोसायटी, बालाजी पॅलेस, खराडी, पुणे १४ | वाघोली, ता.हवेली, जि.पुणे | मराठी | १ ली |
| ४ | यशस्वी शिक्षण प्रसारक मंडळ, संत तुकाराम नगर, भोसरी | संत तुकाराम नगर, भोसरी | मराठी | १ ली |

एकूण : ४ (चार) प्राथमिक शाळा.